नागपूरचा रस्ता गेला चोरीला ; नागरिकांचा आरोप , ग्रामस्थांचे वर्षानुवर्षांपासून हाल कायम >>पान 2

कोणी काय खायचे ते खा; सुप्रिया सुळे यांना हे शोभत नाही >>पान 3

भारत भ्रमण करण्याचा बेत फसला >>पान 4

सुविचार

कष्टाशिवाय फळ मिळत नाही.


दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 34 ■ सोमवार, दि. 25 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



बॅटल ऑफ गलवानच्या सेटवरुन सलमान खानचा फोटो व्हायरल... आतील पान

## एकनाथ शिंदे यांना देवेंद्र फडणवीस काम करून देत नव्हते, मनोज जरांगे पाटील यांची टिका



**बीड/प्रतिनिधी :** तुम्ही हल्ला सनदशीर मार्गाने केला होता का आंतरवलीत ? कुठून कुठून वेगवेगळ्या आडनावाचे लोक गोळा केले, आणि आमच्या आई बहिणींची डोके फोडले. आमच्या धान्यात आहे ते कोण होते. तुम्ही सनदशीर मार्गाने केलं का? आम्ही लोकशाही मार्गाने बसलो होतो.आजही लोकशाही मार्गाने मुंबईला चाललो आहोत, आम्ही कोणाला दगड मारले का ? फडणवीसांचे ठरलेले षडयंत्र ते उघडे पडायला लागले आहेत. आम्हाला पक्की खबर आली, एकनाथ शिंदे यांना फडणवीस काम करून देत नव्हते.अशी टिका मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना केली. यावेळी ते म्हणाले की, फडणवीस एका चॅनेलच्या व्यासपीठावर म्हणाले, मी अडवत नाही. मात्र आता तर तुम्ही आहेत, ८ महिने झाले. का आरक्षण दिले नाही. याचा अर्थ एकनाथ शिंदे यांना काम करू दिले नाही, अजित पवार यांना काम करू दिले नाही.२६ तारखेपर्यंत अंमलबजावणी करा, तोपर्यंत आम्ही बोलायला तयार आहोत.मात्र, एकदा २७ तारखेला आंतरवाली सोडली, तर आम्ही पुन्हा बोलणार नाहीत. येवल्यात बसलेला त्यांचा मुकादम आहे. त्यांनी एक रणनीती ठरवली आहे. आंदोलनात दंगल घडून आणायची आहे त्यांना. असा आरोपही मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी केला.

## अति पावसामुळे भाजीपाला पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव; शेतकरी वर्ग हैराण, नुकसान भरपाई मिळण्याची मागणी



**सांगली/प्रतिनिधी:** सांगलीच्या वाळवा शिराळा तालुक्यात गेली आठ दिवस पावसाची संततधार चालू होती त्यामुळे नदीकाठावरील ऊस शेती, भात शेती तसेच भाजीपाला पिके पाण्याखाली गेली आहेत. तसेच सखल भागातील भाजीपाल्यावर पावसामुळे करपा रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने हाता तोंडाला आलेली पिके गेल्याने बळीराजा हैराण झाला आहे.

वाळवा तालुक्यातील येलूर येथील. आनंदराव सदाशिव पाटील(जाधव) यांचे कोबीचे पिक हाता.. तोंडाला आले होते पंधरा दिवसात त्याचा बाजार चालू होणार होता अति पावसामुळे त्यांच्या कोबी पिकावर करपा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने पीक वाया गेले आहे. त्यामुळे त्यांचे लाखोचे नुकसान झाले आहे. सदर पिकाचे नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतकरी जाधव पाटील यांनी केली आहे.

## अजित पवारांच्या जिल्ह्यातच लाडकी बहीण योजनेचे सर्वाधिक बोगस लाभार्थी

**पुर्णे/प्रतिनिधी:** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा गैरफायदा उठवणाऱ्यांच्या विरोधात सरकारने राबवलेल्या शोध मोहिमेमध्ये दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या जिल्ह्यात सर्वाधिक बोगस लाभार्थी आढळून आल्याची माहिती समोर आली आहे.

उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या जिल्ह्यात सर्वाधिक दोन लाख चार हजार बोगस लाभार्थी मिळून आले आहेत. सरकारने राबविलेल्या शोधमोहिमेमध्ये तब्बल २६ लाख ३४ हजार बोगस लाभार्थी आढळले आहेत. हे सर्व लाभार्थी प्रत्यक्षात पात्र नसतानाही दरमहा १५०० रुपयांचा निधी घेत होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर सरकारची फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले असून, यावर तोडगा म्हणून राज्यभरातील सर्व पात्र लाभार्थ्यांची पुन्हा एकदा ई-केवायसीद्वारे पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# मत चोरीची एसआयआर ही संस्थात्मक पद्धत

## राहुल गांधी यांचा निवडणूक आयोगावर हल्लाबोल

**अररिया/पूर्णिया/पाटणा** – निवडणूक आयोगावरील हल्ला तीव्र करताना, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सांगितलं की, सध्या बिहारमध्ये सुरू असलेली विशेष सघन सुधारणा ही भारतीय जनता पक्षाच्या () भागीदारीत मते चोरण्याचा एक संस्थात्मक मार्ग आहे. त्यांनी कोणत्याही परिस्थितीत बिहारमध्ये असे होऊ न देण्याची शपथ घेतली.

ही बिहारमध्ये मत चोरीची एक संस्थात्मक पद्धत आहे. विरोधी पक्ष तक्रार करत आहेत, परंतु भाजपाने एकही तक्रार दाखल केलेली नाही. कारण हे साटंलोटं आहे. निवडणूक आयोग, निवडणूक आयुक्त आणि भाजपा यांच्यात ही भागीदारी आहे,'' असं राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधी यांनी निदर्शनास आणून दिलं की निवडणूक आयोगाची जबाबदारी



योग्य मतदार यादी प्रदान करणे ही होती. परंतु त्यांनी महाराष्ट्र, हरियाणा आणि कर्नाटकमध्ये असं केलं नाही. केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघात अनियमिततेचे असेच आरोप करताना लोकसभा सदस्य आणि माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्याकडून प्रतिज्ञापत्र न मागितल्याबद्दल त्यांनी निवडणूक आयोगाच्या तटस्थतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं.

एसआयआरमधील कथित विसंगतींविरुद्ध मतदार अधिकार यात्रेच्या दुसऱ्या टप्प्याच्या शेवटी राहुल गांधी बिहारमधील अररिया शहरात पत्रकारांशी संवाद साधत होते. वेळापत्रकात एक दिवसाची विश्रांती असल्यानं ते दिल्लीला रवाना झाले. मंगळवारी सुपौल येथून पदयात्रा पुन्हा सुरू होईल. याप्रसंगी त्यांच्यासोबत राष्ट्रीय जनता दल (आरजेडी) नेते तेजस्वी प्रसाद यादव, सीपीआयएमएलचे सरचिटणीस दीपांकर भट्टाचार्य, विकासशील इन्सान पार्टी (व्हीआयपी) प्रमुख मुकेश साहनी आणि इतर अनेक इंडिया आघाडीतील पक्षांचे नेते उपस्थित होते. यात्रा खूप यशस्वी झाली असं सांगून राहुल गांधी यांनी पुढे म्हटलं की लोक स्वेच्छेनं या यात्रेत सहभागी होत आहेत. या यात्रेत सहभागी होण्यासाठी लोकांना बोलावलं जात नाही. ''हे स्पष्ट आहे की बिहारच्या कोट्यवधी लोकांनी मत चोरी बद्दलचा मुद्दा स्वीकारला आहे, जो आम्ही मांडला आहे. आमचा संपूर्ण दबाव निवडणूक आयोगाला त्याचे वर्तन बदलण्यास भाग पाडण्यावर आहे. आम्ही त्यांना सोडणार नाही. आम्ही कोणत्याही किंमतीवर बिहारमध्ये निवडणुका चोरीला जाऊ देणार नाही,'' असं राहुल गांधी पुढे म्हणाले.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सुचवलं की निवडणूक अधिकाऱ्यांनी राज्याचा दौरा करून प्रत्यक्षात काय घडलं आहे ते पाहावं. ''जे जिवंत आहेत त्यांना मारले गेले आहे. ज्यांनी चार-पाच वेळा मतदान केलं आहे त्यांना मतदार यादीतून वगळण्यात आलं आहे. मी जिथे जिथे जातो तिथे अशा लोकांना भेटतो. बाहेर रस्त्यावर मला अनेक लोक भेटले, ज्यांनी मला सांगितलं की त्यांची नावं वगळण्यात आली आहेत,'' अशी माहितीही राहुल गांधी यांनी दिली.

## निवडणूक महायुतीत लढेल आणि महायुतीच जिंकेल

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** लोकांना भ्रमित होण्याचे कारण नाही, आमची महायुती अभेद्य आहे. आम्ही महायुती मध्येच लढणार आहोत. आम्हाला कोण भेटतो यावरून युती ठरत नाही, कोण भेटतो या वरून राजकारण होत नसते. निवडणूक महायुतीत लढेल आणि महायुतीच जिंकेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की,राज ठाकरे मत चोरी आरोपावर बोलताना गालिब ने म्हटले होते दिल बहलाने के लिये ख्याल अच्छा है.अशी शेरोशायरी करून मी यावर एवढेच बोलणार असे मत व्यक्त केले. जोवर सत्य



स्वीकारणार नाही, तोवर सर्व पक्षांची अवस्था अशीच राहील असेही ते म्हणाले.२०१४ मध्ये मोदी जिंकले तेव्हा काँग्रेसचे देशात आणि राज्यात सत्ता होती. १५-१५ वर्षांपासून सत्ता होती. जोवर हे विचार करणार नाही की आपण का हरतो आहे, जनतेने आपल्याला का नाकारले आहे, याचा अभ्यास न करता छाती बडवण्याचा काम करतील.. तोवर हे जिंकणार नाहीत.लाडकी बहीण याबद्दल चौकशी होत आहे. चुकीचे लाभ घेणारे आहेत, त्यांचे लाभ बंद केले जाईल. खरगे मोदी आरोप खर्गे बद्दल मला का विचारता.. त्यांना आम्ही सिरीयसली घेत नाही. राज ठाकरे फडणवीस वारंवार भेट, ठाकरे बंधू युती चर्चा होत आहे. लोकांना भ्रमित होण्याचे कारण नाही, आमची महायुती अभेद्य आहे. आम्ही महायुती मध्येच लढणार आहोत. आम्हाला कोण भेटतो यावरून युती ठरत नाही, कोण भेटतो या वरून राजकारण होत नसते. निवडणूक महायुतीत लढेल आणि महायुतीच जिंकेल. असा विश्वास यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

## भारतीय सैनिक अरुणाचल प्रदेश, पठाणकोट, गुवाहाटी, राजस्थानसह सीमावर्ती भागात करणार दगडूशेठ गणपतीची प्रतिष्ठापना

**पुर्णे/प्रतिनिधी:** सामान्य नागरिकांप्रमाणेच देशाच्या सीमेवर लढणारे सैनिक देखील बाप्पाचे भक्त आहेत. भारतीय सैनिक सीमेवर अहोरात्र पहारा देत असल्यानं त्यांना गणेशोत्सवात सहभागी होता येत नाही. त्यामुळं यंदा भारतीय सैन्यातील ३३, ६, १९, १, १०१ इन्फन्ट्री आणि ७१ इन्फन्ट्री युनिटच्या सैनिकांना अरुणाचल प्रदेश, पठाणकोट, गुवाहाटी आणि राजस्थानसह सीमा भागात गणेशोत्सव साजरा करण्यासाठी श्रींची प्रतिकात्मक मूर्ती स्थापन करण्यासाठी देण्यात आल्या आहेत. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टच्या वतीनं श्रींची हुबेहूब दोन फुटी प्रतिकात्मक मूर्ती रविवारी विविध ठिकाणी पाठवण्यात आली आहे.

मूर्ती सीमा भागात रवाना : सीमावर्ती भागात दगडूशेठ गणपतीची प्रतिकात्मक मूर्ती स्थापन करण्याची इच्छा सैनिकांच्या वतीनं व्यक्त करण्यात आली होती. यानुसार



रविवारी या मूर्ती विविध ठिकाणी रवाना झाल्या. यावेळी ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सीमेवर तैनात असताना भारतीय सैनिक परिवारासोबत उत्सव साजरा करू शकत नाही. ते या बाप्पाच्या मंडपाला आपलं घर-परिवार समजुन भक्तीभावानं उत्सवात सहभागी होतात. राज्यात गणोशत्सवाची लगबग पाहायला मिळते. बाप्पाच्या आगमणामुळं सर्वजणचं खूश असतात. आगमनापूर्वी तयारीच्या साहित्यानं सर्व बाजारपेठा सजल्या आहेत. बाप्पाच्या आगमनाची चाहूलच सुखावणारी असते.

## शेतकऱ्यांच्या बांधावर जावुन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेत जमिनीची पाहणी

### पंचनामाचे चावडी वाचन करून घेण्याचे शेतकऱ्यांना केले आवाहन







दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या बाधित क्षेत्राची नोंद पंचनामांमध्ये करून घ्या ..पंचनामाचे चावडी वाचन करून घ्या .. असे आवाहन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले .नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे आहे असा विश्वासही त्यांन शेतकऱ्यांना दिला

१८ आणि १९ऑगस्ट रोजी बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यामध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस झाला या अतिवृष्टीमुळे शेतात पाणी तुंबुन शेतकऱ्यांच्या शेत जमिनी खरडून गेल्या आहेत यामध्ये अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आज २३ ऑगस्ट रोजी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी नुकसानग्रस्त भागाचा दौरा केला नुकसानग्रस्त शेताच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे आहे नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

या आपत्तीला शेतकऱ्यांनी हिमतीने सामोरे गेले पाहिजे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यासंदर्भात अधिकारी कर्मचाऱ्यांना निर्देशित केले आहे परंतु शेतकऱ्यांनी सुद्धा नुकसानीचे पंचनामे योग्य पद्धतीने नुकसानीची नोंद तपासून पहा. झालेल्या पंचनामांची चावडी वाचन करून घ्यावे जेणेकरून कोणताही नुकसानग्रस्त शेतकरी सरकारच्या मदतीपासून वंचित राहणार नाही असे आवाहन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी शेतकऱ्यांसोबत संवाद साधतांना केले अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करून संबंधित विभागाला तात्काळ मदत देण्याच्या सुचना केल्यात आज केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी चिखली शहरातील माळीपुरा भागात नागरिकांच्या घरात पाणी असले होते झालेल्या नुकसानीची पाहणी केली त्यानंतर तालुक्यातील सोमठाणा उत्रादा, पेठ,बोरगाव काकडे , पांढरदेव , भरोसा भोरसी या गावातील शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी बांधावर जाऊन केली यावेळी त्यांच्यासोबत शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख मायाताई म्हस्के तालुकाप्रमुख गजानन मोरे शहर प्रमुख विलास घोलप भास्कर राऊत शरद हाडे पंडितदादा देशमुख शंतनू बोंद्रे एकनाथ जाधव अरविंद माने अंकुश पाटील डॉ सपकाळ यांच्यासह शिवसेना भाजप युतीचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते

## गणेशोत्सवात विधायक कामे करावीत

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करुन शतकोत्तर रौप्य महोत्सव उलटला आहे. इंग्रजांच्या राजवटीत भारतीय संस्कृतीची उघड उघड विटंबना होत होती. इंग्रजांच्या दमनशाही विरुद्ध तरुण एकत्र यायला तयार नव्हते. तरुणांना एकत्र आणल्याशिवाय इंग्रजांविरुद्ध लढा देणे अशक्य आहे हे ओळखून लोकमान्य टिळकांनी तरुणांना एकत्र आणण्यासाठी व त्यांच्यात देशभक्तीची मशाल पेटवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव ही महाराष्ट्राची परंपरा बनली. आजही ती परंपरा मोठया भक्तिभावाने जोपासली जाते. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. गणेशोत्सव महाराष्ट्राची ओळख आहे. लवकरच गणेशाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत सर्वच गणेशभक्त गणेशाची मनोभावी पूजा करतात. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते मात्र अलीकडच्या काळात गणेशोत्सवाचे हे स्वरूप बदलू लागले आहे. टिळकांनी ज्या उद्देशाने हा सण सुरू केला तो उद्देशच आता हरपला आहे. इतकेच काय पण या उत्सवाचे पावित्र्यही कमी होऊ लागले आहे. आज हा उत्सव न राहता इव्हेंट बनला आहे. उंचच उंच मूर्तींची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. या मोठ्या मुर्त्या समुद्राच्या पाण्यात विसर्जित करताना दोरीच्या साहाय्याने बांधाव्या लागतात. उंचच उंच मूर्तीचे अवडंबर न माजवता पर्यावरण पूरक गणेश मूर्ती खरेदी करून तिची प्राणप्रतिष्ठा करावी. शास्त्रानुसार शाडूच्या मातीने गणेश मूर्ती बनवावी असे सांगितले आहे असे असतानाही सर्रास प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून मुर्त्या बनवल्या जातात. या मुर्त्या पाण्यात विरघळत नसल्याने पाण्याचेही प्रदूषण होते. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनी प्रदूषणही खूप वाढते. गणेशोत्सवात डॉल्बीच्या स्पीकरवर मोठमोठ्या आवाजात गाणी लावून चित्रपटांच्या गाण्यावर हिडीस नृत्य करण्याची फॅशन रूढ झाली आहे. या डॉल्बीचा आवाज इतका मोठा असतो की त्याचा परिणाम लहान मुले व जेष्ठ नागरिकांच्या श्रवण इंद्रियांवर होऊ शकतो. उत्सवाच्या नावाखाली वर्गणी उकळली जाते प्रसंगी धमकीही दिली जाते. त्यावरही गणेशभक्त नाराज आहेत. भक्तांनी जितकी वर्गणी दिली भक्तांनी तीच दान म्हणून स्वीकारावी. गणेशोत्सवात डोळे दिपवणारी रोषणाई केली जाते त्यामुळे विजेचाही अपव्यय होतो. तेंव्हा सजावटी रोषणाई यावर मर्यादा घालावी. काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आपल्या मंडळाचे मार्केटिंग करत आहेत. नवसाला पावणारा गणपती अशी जाहिरात करून सिलेंब्रेटींना बोलवले जाते. त्यातूनच मग मंडळा- मंडळामध्ये मतभेद होऊन तेढ निर्माण होते त्यातूनच मग कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. टिळकांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यास सांगितले आहे. दुसऱ्यांना त्रास होऊ न देता गणेशोत्सव साजरा केला पाहिजे. गणेश मंडळांनी दहा दिवसांच्या कालावधीत सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत. गणेश मंडळांनी समाजाला उपयोगी पडतील अशी विधायक कामे करावीत. गणेश मंडळांनी रक्तदान शिबिर आयोजित करावीत. दुष्काळग्रस्तांना, पूरग्रस्तांना मदत करावी तसेच गरीब आणि कोरोना काळात पालक गमवलेल्या अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारावे. अनाथ आश्रम, वृद्ध आश्रमांना मदत करावी. गणेश मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा, नृत्य , निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करावे. गणेश ही बुद्धीची देवता आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढीस लागेल असे उपक्रम राबवावेत. हा उत्सव जितका साधेपणाने साजरा केला जाईल तितकेच त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल.

# नागापूरचा रस्ता गेला चोरीला ; नागरिकांचा आरोप
# ग्रामस्थांचे वर्षानुवर्षांपासून हाल कायम

**दैनिक आपला विदर्भ**





**मेहकर/प्रतिनिधी:** शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या मेहकर मतदार संघातील व विशेष म्हणजे ग्रामपंचायतीवर शिवसेना पक्षाची सत्ता असताना नागापूर येथील रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली आहे. तब्बल १५ ते २० वर्षांपासून नागापूर येथील रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नागरिकांच्या या समस्यांना आपला विदर्भने वाचा फोडीत ग्रामपंचायतीचा अनागोंदी कारभार चव्हाट्यावर आणला आहे. आपला विदर्भ ने सदर समस्या बाबत ऑन द स्पॉट जाऊन पोलखोल केली असता, सदर रस्ता हा चोरी गेल्याची माहिती ग्रामस्थांनी देत ग्रामपंचायतच्या गलथान कारभाराबाबत आपली तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

ग्रामस्थांच्या या समस्याबाबत प्रशासनाचा काय भूमिका घेते, याकडे नागापूरवासीयांचे लक्ष लागले आहे. मेहकर मतदार संघातील हायवे लगत असलेल्या जवळपास ३ हजार लोकसंख्येंच्या गावातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. विशेष म्हणजे मेहकर लोणार मतदार संघ हा गेल्या तीन टर्मपासून शिवसेनेच्या ताब्यात आहे. नागापूर येथूनही शिवसेनेला नेहमीच मतदारांनी भरभरून मते दिली आहेत. गावातील ग्रामपंचायतीवरही शिवसेनेची सत्ता असल्याचे बोलवले जात आहे. माजी आमदार संजय रायमुलकर यांनी या ठिकाणी रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला.

मात्र, ग्रामपंचायतच्या गलथान कारभाराने हा रस्ता पूर्णत्वास गेला नाही. त्यामुळे तब्बल पंधरा वर्षांपासून येथील नागरिकांना चिखल तुडवीत मार्गक्रमण करावे लागत आहे. रस्त्यावर घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.लहान मुले, वृद्धांना अनेक संकटाचा सामना करावा लागत आहे. आजुबाजुच्या घरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. वर्षा नऊ वर्षांपासून सदर रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असताना ग्रामपंचायतीने या रस्त्यावर मुरूम टाकण्याची तसदीही घेतली नसल्याने नागरिकांनी आपला विदर्भला आपली आपबिती व्यक्त करताना सांगितले. स्थानिक राजकारणामुळे सदर रस्ता रखडला असल्याची माहिती नागरिकांनी दिली असून रस्त्याच्या दुरवस्थेमुळे मात्र, नागरिकांच्या जीवाशी खेळले जात आहे.

सदर रस्ता दुरुस्त करावा, यासाठी गावातील नागरिकांनी ग्रामपंचायत प्रशासनाला वारंवार मागणी केली. मात्र, ग्रामपंचायत पदाधिकारी हे यांनी सरपंच आमचे एकच नाही असे सांगून आपली जबाबदारी झटकली. तर, सरपंच हे तुम्हाला काय करायचे ते करा, असे म्हणून सदर समस्यांकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोपही ग्रामस्थांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना केला आहे. ग्रामपंचायत प्रशासन कोणत्याही योजना गावांमध्ये राबवत नाहीत असा आरोप नागरिकांनी करून योजनेची परस्पर कागदपत्रे राबवून शासन निधी हडप केला जात असल्याचा आरोप ही नागरिकांनी केला आहे. या ठिकाणी माजी आमदार संजय रायमुलकर यांनी रस्ता मंजूर करून दिला होता. मात्र, तो रस्ता पूर्ण न होता रस्ता चोरी गेला आहे. असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

रस्त्याचे अत्यंत दुरवस्था असल्याने आम्ही जंगलात राहतो की, गावात हा सुद्धा कळायला मार्ग नाही, अशी व्यथा ही ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे सदर रस्ता हा हायवेला लागून आहे व १०० फूट अंतरावर गावात जाण्यासाठी या रस्त्याचा वापर होत आहे. मुख्य रस्ता असतानाही रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाल्याच्या नंतर ग्रामपंचायत प्रशासनाने याबाबत दुर्लक्ष केल्याने ग्रामस्थांनी तीव्र रोष व्यक्त केला आहे. विधानसभा निवडणुकीच्या कार्यकाळात आमदार संजय रायमुलकर यांनी मतदारसंघात ४ हजार ५०० कोटी रुपयांचे कामे आणले असल्याचा दावा प्रचारात केला होता. मात्र, या ४ हजार ५०० कोटी रुपयांच्या कामांमध्ये नागापूरचा समावेश नव्हता का? असा प्रश्नही उपस्थित होत आहे. ग्रामपंचायत प्रशासनाच्या या अत्यंत दुर्लक्षित धोरणामुळे शिवसेनेची ग्रामपंचायत म्हणून ओळखली जाणारी नागापूर गावात मतदारांनी ग्रामपंचायतीच्या गलथान कारभाराविरोधात जात आमदार सिद्धार्थ खरात यांना ११७ मतांचा लीड देत पूर्वीच्या पदाधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त केली. आतातरी वर्षानुवर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा, अशी विनवणी ग्रामस्थांनी केली आहे.

## पैठणीचा फेटा व पैठणी वस्त्र परिधान केलेल्या गणरायाचे आगमन



**नाशिक/प्रतिनिधी:** गणेशोत्सवाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या भक्तांसाठी यंदा बाजारपेठेत एक वेगळे आकर्षण ठरले आहे. येवल्यात पैठणीची झळाळी आणि परंपरेचा साज घेऊन गणराय बाजारात दाखल झाले आहेत. पैठणीचे वस्त्र परिधान केलेल्या आणि पैठणी फेटा मिरवणाऱ्या गणेशमूर्तींनी भक्तांची मने जिंकली आहेत. पारंपरिक मराठमोळा थाट, नाजूक डिझाइन आणि पैठणीच्या रंगीबेरंगी झळाळीमुळे हा बाप्पा भक्तांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. गणेशमूर्तीभोवती काढलेली पैठणीची सजावट देखील आकर्षणाचा विषय ठरत आहे.

## बॅटल ऑफ गलवानच्या सेटवरून सलमान खानचा फोटो व्हायरल...

**मुंबई /प्रतिनिधी:**अभिनेता सलमान खानच्या बॅटल ऑफ गलवान चित्रपटाचे शूटिंग सुरू झालं आहे. चित्रपटाचं दिग्दर्शक अपूर्व लाखिया यांनी बॅटल ऑफ गलवान चित्रपटाच्या पूजा सोहळ्याचे आणि लोकेशनचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केले आहेत. यापूर्वी असं म्हटलं जात होतं की, भारत आणि चीनमधील वाईट संबंधांमुळं या चित्रपटाचं शूटिंग थांबविण्यात आलं होतं. दरम्यान गलवान व्हॅलीचे युद्ध भारत आणि चीनमध्ये झाले होते, त्यानंतर दोन्ही देशांमधील संबंध खूप गुंतागुंतीचे झाले. दरम्यान बॉक्स ऑफिसवर सलमान खानचा शेवटचा चित्रपट सिकंदर फ्लॉप झाल्यानंतर, बॅटल ऑफ गलवानची घोषणा करण्यात आली. या चित्रपटामधील सलमान खानचा फर्स्ट लूकही समोर आला आहे.

२१ ऑगस्टच्या रात्री, चित्रपट व्यापार विश्लेषकांनी बॅटल ऑफ गलवानच्या सेटवरून एक फोटो देखील शेअर केला आहे, ज्यामध्ये सलमान खान सेटवर उभा असल्याचा दिसत आहे. ही पोस्ट शेअर करताना तरण आदर्श यांनी लिहिलं आहे की, सुपरस्टार सलमान खाननं गलवान व्हॅलीमध्ये पाऊल ठेवले आहे, त्याची आभा, त्याची मजबूत ऊर्जा, लार्जर दॅन लाईफ एन्ट्री आणि देशभक्तीची भावना यामुळं चित्रपट एका वेगळ्याच पातळीवर गेला आहे. तरण आदर्श यांनी शेअर केलेल्या फोटोमध्ये, सलमान खान लडाखमध्ये जीन्स आणि जॅकेट घालून कॅमेऱ्यांकडे पाठ करून उभा असल्याचा दिसत आहे.

# अधिकाधिक लोकहितासह देशाच्या सुरक्षिततेसाठी कालसुसंगत परिपूर्ण संशोधनाची गरज-प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

## तरुणांची भूमिका आणि विकास या परिषदेचा समारोप

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी:** कोणत्याही शिक्षणाचे, संशोधनाचे अंतिम ध्येय हे लोक कल्याणासमवेत विकासाला गती आणि देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिक महत्वपूर्ण असते. बदलत्या तंत्रज्ञानाच्या व कृत्रिम गुणवत्तेच्या या काळात देशाला जर अधिक सुरक्षित आणि भक्कम करायचे असेल तर युवकांनी आपल्या संशोधनाची व्याप्ती जागतिक ज्ञानाच्या कक्षेसमवेत उंचावत ठेवली पाहिजे, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान .सचिव ब्रिजेश सिंह यांनी केले.

राष्ट्रीय सुरक्षेसाठी तरुणांची भूमिका आणि विकास या विषयावर सर विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी येथे दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. ही परिषद युथ फॉर नेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली. यावेळी ले.जनरल व्ही. के. चतुर्वेदी, संपादक सरिता कौशिक, प्रोफेसर योगेश देशपांडे उपस्थित होते. भारतातील शैक्षणिक सुविधा भक्कम होत असताना या शैक्षणिक संस्थांमधून, विद्यापीठांमधून जे संशोधन होत आहे, जे पेटंट आपण मोठ्या संख्येने मिळवित आहोत. त्या पेटंटमध्ये आजच्या काळाशी साधर्मय साधणारी, आजच्या काळाला आवश्यक असणारे हे पेटंटस आहेत का हा कळीचा प्रश्न आहे. विकास प्रक्रियेला सर्वार्थाने सक्षम करण्यासाठी लोकहित, देशाची सुरक्षितता, सुरक्षित माहिती तंत्रज्ञान या बाबींवर युवकांनी अधिक भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. सायबर सेक्युरिटी अर्थात आपल्या वैयक्तिक आर्थिक माहितीसह देशाच्या सुरक्षिततेबाबत असणारी माहिती ही अधिक सुरक्षित असली पाहिजे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कुणाचीही होणारी फसवणूक ही आपण इतरांना दिलेल्या माहितीतूनच होते हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

पैशाचा जिथे संबंध असतो तिथे फसवणूक व गुन्ह्याची शक्यता अधिक असते. दूरध्वनीवर, सोशल मीडियाच्या प्लॅटफॉर्मवर, आपल्याशी साधला जाणारा संवाद हा मानशास्त्रीय हॅकचा प्रकार तर नाही ना, याची दहादा प्रत्येकाने खातरजमा करून घेतली पाहिजे. जर अशा संभाषणात आपण बळी पडलो, आपले पैसे कुणी खात्यातून वळविले तर त्वरित १९३० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून आपली तक्रार नोंदविण्याचे आवाहन त्यांनी केले. शासनात डिजिटल अरेस्ट हा प्रकार अजिबात नाही. शंका येणारे संदेश गुगलवर टाकून पाहिल्यास त्याबाबत लागलीच स्पष्टता आपल्याला मिळते. सायबर दोस्त हे एक्सवरील शासनाचे स्वतंत्र हँडल यासाठीच तयार करण्यात आले आहे. गुगलसारख्या संकेतस्थळावर अनेकदा दिशाभूल करणारी माहिती दिल्या जाते हे सत्य नाकारून चालणार नाही. जो डाटा फिड करण्यात आला आहे तो डाटा गुगलवरील सर्चच्या माध्यमातून आपल्या पुढ्यात येतो. अनेकदा हा डाटा राष्ट्रीय पातळीवरील द्वेषभावनेतून इतर शत्रू राष्ट्राकडून दिशाभूल करणाराही असू शकतो हे आपण समजून घेतले पाहिजे. यासाठी आपले डेटा सेंटर अधिक भक्कम करण्यासाठी युवा तंत्रज्ञ पुढाकार घेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नागपूर येथील या दोन दिवसीय परिसंवादाच्या माध्यमातून शिवकालीन इतिहासासह अनेक संदर्भांना साक्षीदार होता आले. सीमा प्रश्न व शेजारील राष्ट्रांकडून होणारी घुसखोरी अनेक वर्षांपासून होत असल्याचे आपल्या निदर्शनास येते. भारतासारख्या यशाच्या शिखराकडे जाणा-या देशाला रोखण्यासाठी अनेक देशातील घटक अडथळे निर्माण करतात हे आपण लक्षात घेतले पाहिजे. ही घुसखोरी रोखण्यासाठी सैन्यबळासह तंत्रज्ञानाचे बळ अधिक मोठ्या प्रमाणात आपल्याला कसे करता येईल, आपल्या सैन्याला अधिक तंत्रकुशल कसे करता येईल यावर आपण प्राधान्याने लक्ष देण्याची गरज ले. जनरल व्ही. के. चतुर्वेदी यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केली.देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आपले नैतिक अधिष्ठान अधिक भक्कम असले पाहिजे.

प्रत्येकातील प्रामाणिकपणा व नागरिक म्हणून आपल्यावर असलेल्या कर्तव्याचे जबाबदारीपूर्ण पालन करणे महत्वाचे आहे. इतरांच्या भल्यासाठी जोपर्यंत प्रत्येक जण प्रयत्न करणार नाही, तोपर्यंत प्रत्येकाला विकासाच्या प्रवाहात येता येणार नाही, असे प्रतिपादन संपादक सरिता कौशिक यांनी केले. परिसंवादाचे प्रास्ताविक प्रोफेसर योगेश देशपांडे यांनी केले. परिसंवादास विद्यार्थी व संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...


### मनोज जरांगे यांच्या मुंबई आंदोलनाला दिपक केदार यांचा पाठिंबा



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी:** मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या मुंबई आंदोलनाला ऑल इंडिया पँथर संघटनेचा पाठिंबा असल्याची माहिती दिपक केदार यांनी दिली आहे. ते जालना दौऱ्यावर असताना पत्रकारांशी बोलत होते. २९ ऑगस्ट जरांगे यांचा मुंबईत मोर्चा असणार आहे. त्यामुळे मराठा समाजाच्या सामाजिक आंदोलनाला आमचा पाठिंबा आहे. मात्र लक्ष्मण हाके आणि वाघमारे यांनी बीडमध्ये बैठक घेतली. या बैठकीला संतोष देशमुख यांचे मारेकरी उपस्थित होते. त्यामुळे हाके आणि वाघमारे यांच्या बैठकीची चौकशी झाली पाहिजे. आंदोलनावेळी दंगल घडणार नाही, याची गृहविभागाने काळजी घेतली पाहिजे. आणि हाके आणि वाघमारे यांच्या बैठकीवर बंदी आणावी, अशी मागणी करत जरांगेंच्या आंदोलनाला दिपक केदार यांनी पाठिंबा दिला आहे.

### गणशोत्सवासाठी रत्नागिरीच्या बाजारपेठांमध्ये खरेदीची मोठी उलाढाल



दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी:** गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. कोकणात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्यामुळे रत्नागिरीच्या बाजारपेठा देखील खुलून गेल्या आहेत. गणपतीसाठी लागणारे मकराचे साहित्य, लाईट झुंबर, लटकन, निरनिराळे चमकी वाले पडदे, फुलांच्या सर्व प्रकारच्या माळा अष्टविनायकांची विविध रूपांचे डेकोरेशन, फ ुलांच्यावेली, आरासासाठी फोमचे विविध फुलांनी सजविलेले आर्च, तोरणे, रेडीमेड मकर, पूजेचे साहित्य इत्यादी वस्तूंची खरेदी करण्यासाठी नागरिक मोठ्या प्रमाणात गर्दी करत आहेत. त्यामुळे रत्नागिरीच्या बाजारपेठांमध्ये खरेदीची मोठी उलाढाल होताना दिसून येत आहे.

### सांगली जवळील कर्नाळ गावातील मौजे डिग्रज रोडवर रात्री १३ फुटी मगर आढळली



**सांगली/प्रतिनिधी:** सांगली जवळील कर्नाळ गावातील मौजे डिग्रज मधील ओढ्यावरील रोडवर रात्री १३ फुटी मगर आढळून आली आहे. कृष्णा नदीची पाणी पातळी ओसरल्यानंतर अनेक ठिकाणी मगरीचे दर्शन होऊ लागले आहे. कर्नाळ गावातील मौजे डिग्रज रोडवरील ओढ्यातील पुलावर रात्री ही मगर आढळून आल्यावर नागरिकांनी वन विभागाला ही बाब कळवली. पण वन विभागाच्या टीमला रात्री पकडणे शक्य नसल्यामुळे मगरीने पुन्हा ओढ्यातील पाण्यामध्ये आश्रय घेतला आहे. त्यामुळे त्या भागातील गावातील सर्व शेतकऱ्यांनी शेतामध्ये जात असताना काळजी घ्यावी, असे आवाहन वन विभागाकडून करण्यातआलेआहे.

### दहशतवाद्याच्या संशयित साथीदारानं बंदूक रोखताच पोलिसांनी झाडली गोळी, अंधाराचा फायदा घेत आरोपी पसार

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी:** शहरामध्ये पोलीस आणि आरोपीमध्ये शनिवारी रात्री दहा वाजण्याच्या सुम ारास सिनेस्टाईल थरार पहायला मिळाला. सुरज सिंग गाडीवाले हा सराईत गुन्हेगार आहे. विविध गुन्ह्यांमध्ये गाडीवाले हा पोलिसांना हवा आहे. अनेक दिवसांपासून पोलीस त्याचा शोध घेत होते. पोलिसांना आरोपी गाडीवाले हा नांदेड शहरातील कौठा भागात असल्याची गुप्त माहिती मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या भागात धाव घेतली. सुरससिंग गाडीवालेनं पकडण्यासाठी आलेल्या पोलिसांना पाहताच त्यांच्या दिशेनं गावठी पिस्तूल रोखली. पोलिसांनी प्रसंगावधान राखून गोळी झाडली.

# कोणी काय खायचे ते खा; सुप्रिया सुळे यांना हे शोभत नाही

## आमदार प्रविण दरेकरांचा विरोधकांवर घणाघात

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी:** ''कोणी काय खायचे ते खा, बंदी नाही; आपला महाराष्ट्र हा वारकरी संप्रदायाचा आहे. त्यामुळे अशा विषयावर बोलणे हे खासदार सुप्रिया सुळे यांना शोभत नाही,'' अशा तीव्र शब्दांत आमदार प्रविण दरेकर यांनी विरोधकांवर टीका केली. नाशिक येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी अनेक राजकीय घडामोडींवर आपली परखड भूमिका मांडली.

प्रविण दरेकर म्हणाले की, मराठा आरक्षणाबाबत राज्य सरकार सकारात्मक आहे. ''जरांगे पाटील यांना आंदोलनाचा अधिकार आहे. मात्र, हे लक्षात घ्यायला हवे की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले आहे. कायद्याच्या चौकटीत राहून जे शक्य आहे, तेच सरकारकडून दिले जाईल,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

**मत चोरला, हे म्हणणे जनतेचा अपमान**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केलेल्या मत चोरीच्या आरोपांवरही दरेकरांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. ''संजय राऊत यांनी मत चोरीचे जे आरोप केले आहेत, ते केवळ जनतेचा अपमान आहेत. महाराष्ट्रातील जनतेने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे त्यांनी जनतेची माफी मागावी,'' अशी मागणी त्यांनी केली.

**राज ठाकरे यांना खुले आव्हान**

''राज ठाकरे यांनी केलेले आरोप हे फक्त तोंडी आहेत. जर त्यांच्याकडे खरेच काही पुरावे असतील, तर त्यांनी ते निवडणूक आयोगासमोर सादर करावेत. अन्यथा, हे केवळ हरलेल्या निवडणुकीसाठी दिली जाणारी कारणे आहेत,'' असेही दरेकर यांनी सांगितले.

**बोगस लाभार्थ्यांवर कठोर कारवाई होणार**

राज्यात लाडकी बहिण योजना अंतर्गत बोगस लाभार्थ्यांबाबत सुरू असलेल्या चर्चांवरही ते म्हणाले, ''सरकारच्या योजनांना स्थिर होण्यासाठी थोडा वेळ लागतो. सुरुवातीला काही तपासणी अडचणी असल्या, तरी आता सर्व काही स्पष्ट होत आहे. जे बोगस लाभार्थी असतील, त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही होणार आहे. सरकारच्या तिजोरीवर कोणताही ताण नाही. लाभ फक्त पात्रांनाच दिला जाईल,'' असे त्यांनी ठामपणे सांगितले.



**सत्ता, विकास आणि आगामी निवडणुका**

महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीकडे सरकार लक्ष केंद्रित करत असल्याचे सांगत दरेकर म्हणाले, ''केंद्र आणि राज्य सरकार दोन्ही विकासावर काम करत आहेत. सध्या विरोधकांना भविष्यातील पराभव स्पष्टपणे दिसतो आहे. त्यामुळेच असे अनावश्यक मुद्दे पुढे आणले जात आहेत.''

**सुप्रिया सुळे आणि मुख्यमंत्र्यांची भेट**

''सुप्रिया सुळे या खासदार आहेत. त्यांनी मुख्यमंत्र्यांची वेळ मागितली होती की नाही, हे मला ठाऊक नाही. पण जर भेटीचं नाटक करत असतील आणि माध्यमांमध्ये पत्रं पाठवून प्रसिद्धी मिळवायची असेल, तर ते योग्य नाही. मुख्यमंत्री कोणालाही भेटतात. राजकारण करताना समाजमन आणि कायदा-सुव्यवस्थेवर काय परिणाम होईल, हे पाहायला हवे,'' असा सल्लाही त्यांनी दिला.

**राजकारणातील मतभेद आणि एकजूट**

''एकनाथ शिंदे यांच्याशी आमचे कोणतेही वैयक्तिक मतभेद नाहीत. स्थानिक पातळीवर मतभेद असू शकतात. मात्र, सरकार एकसंघ आहे आणि जनतेने आमच्यावर विश्वास दाखवला आहे. एखादं कुटुंब एकत्र आलं, तर त्याचं स्वागतच आहे. राजकारणात दोन आणि दोन नेहमी चारच होतात असं नाही,'' असे ते म्हणाले.

# दोषींवर कडक कारवाई झाली नाही तर पोलीस आयुक्तालयावर मोर्चा काढणार – जलील



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी:** शहरातील ६ परिसरामध्ये भर दिवसा चाकू मारून खून करण्यात आला. ही घटना खूप निंदनीय आहे, असे माजी खासदार इम्तियाज जलील म्हणाले. एका माणसाचा कशाप्रकारे रस्त्यावर त्याची हत्या करण्यात आली. आणि त्याच्यानंतर काही महिलांना आता पोलिसांच्या समोर दादागिरी करत असेल, तर कुठेतरी मला असं वाटतं की यांना राजकीय संरक्षण आहे. त्यांना पोलिसांचा धाक नाही. पोलीस कर्मचाऱ्यांनी अशी भाषा वापरली योग्य नाही. आम्ही पोलिसांकडे मागणी केलेली आहे जो दोषी असेल, कोणीही असू द्या कितीही राजकीय संरक्षण त्यांना असू द्या त्यांच्यावर कठोर कारवाई करा.पोलिसांचाही यात निष्काळजीपणा आहे. इतक्या तक्रारी देऊन सुद्धा त्यांच्यावर काही कारवाई झाली नाही. नागरिक कशाला लोक पोलीस स्टेशनमध्ये जाणार, ज्या पोलिसांनी अशी भाषा वापरी त्याच्यावर कारवाई व्हायला पाहिजे. घटनेच्या वेळी हत्या करणारे लोक आहे मारणारे तेच दोषी नाही, ज्यांनी बघितलं ते सुद्धा दोषी आहेत. त्यांनी एक मुलगा आपल्या वडिलांना घेऊन जात आहे आणि त्याला मदत करायला सुद्धा कोणी पुढे आलं नाही. पोलीसांचाही निष्काळजीपणा आहे तेही यात दोषी आहेत. चाकू मारताना बघणाऱ्यांची माणुसकी कुठे गेली होती. इतका मोठा सण गणपती बाप्पाचा येणार आहे. आज त्यांचा घरामध्ये काय हाल आहे, या भागामध्ये काय हाल आहे कशाप्रकारे आपण सण साजरा करणार, एका युवाचा असा प्रकारे मृत्यू होतो आणि मृत्यू झाल्यानंतर पोलीस गाड्या घेऊन येतात. आता तुम्ही सेक्युरिटी देऊन काय करणार आहे. आणि किती दिवस देणार सेक्युरिटी, स्पष्टपणे सांगतो या घरावर किंवा त्यांच्या लोकांवर काहीही झाला तर त्याची सगळी जबाबदारी या पोलिसांची असणार आहे. पोलिसांनी कठोर कारवाई केली नाही, तर इतका भव्य मोर्चा पोलीस कमिशनर ऑफिस पर्यंत घेऊन जाणार, सगळ्या लोकांना सोबत घेऊन जाणार अशी प्रतिक्रिया माजी खासदार इम्तियाज जलील यांनी दिली.

# रस्त्याच्या कडा वाहून गेल्याने अपघाताची शक्यता

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष : रस्ता काडा तत्काळ दुरुस्त करण्याची राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांची मागणी**



**डोणगाव/प्रतिनिधी:** डोणगाव ते शेलगाव मार्गावरील बंधाऱ्या जवळील रस्ता वाहून गेल्याने या रस्त्यावर अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. रस्त्याच्या कडा वाहून गेल्याने दुचाकी धारकांचे या ठिकाणी दररोज किरकोळ अपघात होत असून रात्रीच्या वेळेस मोठा अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे. वाहनचलकांचा जीव धोक्यात आला असताना संबंधित विभागाचे याकडे मात्र दुर्लक्ष झाले आहे. वाहन धारकांची समस्या लक्षात घेता सदर रस्ता काडा तात्काळ दुरुस्त करावा अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी दिला आहे.

डोणगाव ते शेलगाव या मार्गावरील बंधाऱ्याजवळील रस्त्याच्या कडाचा एक भाग संपूर्ण वाहून गेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. गत काही दिवसापूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे नदी नाल्यांना पूर आला होता. या रस्त्याच्या बाजुलाच बंधारा असून पुराच्या पाण्यामुळे हे बंधाऱ्या लगत असलेल्या रस्त्याच्या कडा वाहून गेले आहेत. त्यामुळे या ठिकाणी अपघात होण्याची निर्माण झाली आहे तर, दर दिवशी किरकोळ अपघात घडत आहेत. रात्रीच्या वेळेस रस्त्याच्या खचलेल्या कडा वाहन चालकांना दिसत नसल्यामुळे या ठिकाणी मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सदर रस्ता हा तत्काळ दुरुस्त करण्याची गरज असताना याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी मात्र दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तथा वाहन चालकांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. सदर रस्त्याच्या कडा संबंधित विभागाने तात्काळ भरून रस्त्याची दुरुस्ती करावी अशी मागणी होत आहे.

**रस्त्याच्या खचलेल्या कडा तात्काळ भरुन काढा अन्यथा आंदोलन : गोपाल आकडे**

डोणगाव ते शेलगाव मार्गावरील वाहून गेलेल्या रस्त्याची राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी पाहणी केली व संबंधित विभागाला भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून रस्त्याच्या कडा खचून गेलेला पूर्ण भाग हा तात्काळ भरून काढण्याची मागणी केली. सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याची दुरुस्ती करण्याकडे दुर्लक्ष केल्यास राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने आंदोलन करण्यात येईल. असा इशाराही राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे पाटील यांनी दिला आहे.

# सराईत गुंड बाब्याची सैलानीत चाकू भोसकून हत्या

## वर्चस्वाचा वाद गेला होता विकोपाला, ३ आरोपींना पोलिसांनी केली अटक

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा तालुक्यातील सैलानी येथे एका ३८ वर्षीय सराईत गुंडाची खून करण्यात आल्याची घटना घडली आहे.. बुलढाणा शहरातील इंदिरा नगर भागात राहणाऱ्या बाब्या उर्फ शेख नफीस शेख हफीज असे हत्या करण्यात आलेल्या गुंडाचे नाव आहे. बाब्या च्या हत्येने संपूर्ण सैलानी परिसर हादरून गेले आहे..२ टोळ्यांमधील वर्चस्वाच्या वादामुळे ही हत्या करण्यात आल्याची माहिती पोलीसनी दिली आहे.. एलक्स इनोक जोसेफ उर्फ रॉनी, शेख सलमान शेख अशफाक आणि सय्यद वाजिद सय्यद राजू उर्फ वाजिद टोपी सर्व असे अटक करण्यात आलेल्या आरोपींचे नावे आहेत.

सैलानी येथे हाजी हजरत अब्दुल रहमान उर्फ सैलानी बाबा यांची दर्गा असून दरवर्षी पोळ्याच्या अमावश्याला दर्ग्यावर मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात त्यामुळे काल शुक्रवारी सैलानी मोठी गर्दी होती..रात्री भर्री बाबा दर्गा जवळ शेख नफीस शेख हफीज उर्फ बाब्यावर आरोपी एलक्स इनोक जोसेफ उर्फ रॉनी, शेख सलमान शेख अशफाक आणि सय्यद वाजिद सय्यद राजू उर्फ वाजिद टोपी सर्व रा.सैलानी यांनी बाब्या



ची हत्या केली..रायपूर आणि बुलढाणा पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल असून तो रिक्षा देखील चालवत होता.. त्याने सैलानी परिसरात आपली दहशत निर्माण केलेली होती.. दोन टोळ्यांमधील वर्चस्वाचा वाद विकोपाला गेला आणि बाब्याचा गेम करण्यात आला..माहिती मिळताच रायपूर पोलिसांनी घटनास्थळी घाव घेत पंचनामा केला. मृतकाच्या भावाच्या फिर्यादीवरून रायपुर ठाण्यात खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला.. रायपूर मध्ये ठाणेदार राहिलेले दुर्गेशसिंग राजपूत यांना मदतीला बोलविण्यात आले..त्यांनी आरोपींचा शोध घेतला आणि दोघांना माहोरा जि. जालना येथून रात्रीच अटक केली तर तिसऱ्या आरोपीला सैलानी येथून अटक करण्यात आली आहे.. शवविच्छेदनासाठी प्रेत बुलढाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात आणले असून मोठी गर्दी जमलेली होती..

## विविध वृत्त...

### बुलढाणा पोलिस दलाच्या वतीने सायकलथॉन स्पर्धा संपन्न




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या पुढाकारातून ''फिट इंडिया'' मोहीमे अंतर्गत बुलढाणा पोलिस दलाच्या वतीने आज सायकल थॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्हाधिकारी डॉक्टर किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्यासह पोलिस कर्मचारी, महाविद्यालयीन विद्यार्थी , मुली, महिला तसेच सामान्य नागरिकांनी सुद्धा मोठा सहभाग घेतला होता. जिल्हाधिकारी डॉक्टर किरण पाटील यांनी स्पर्धेला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली. नागरिकाचे आरोग्य अबाधित राहिले पाहिजे या उद्देशातून जनजागृती व्हावी यासाठी या स्पर्धेच आयोजन करण्यात आले होते.. तर पोलिस दलाच्या वतीने जिल्ह्यात नशामुक्त बुलढाणा जिल्हा हा सुद्धा उपक्रम राबवल्या जात आहे.

### श्रावण महिना संपल्यानंतर आज मासे, मटन, चिकनच्या दुकानावर तुंबळ गर्दी, चिकनचे भाव झाले कमी, तर मटणाचे दर स्थिर



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** श्रावण महिन्यामध्ये अनेक जण मांसाहार करणे टाळतात, आता श्रावण संपलाय मात्र कालचा शनिवार असल्याने अनेक जणांनी मांसाहार केला नाही. परंतु आज रविवार सुटीचा दिवस आहे, त्यामुळे आज सकाळपासूनच मासे, चिकन, मटणाच्या दुकानवर नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. मंगळवारी हरतालिका आणि बुधवारपासून गणेशोत्सव सुरू होत आहे, या काळातही अनेक जण मांसाहार टाळतात, त्यामुळे आजचा एक दिवस आणि तोही सुटीचा दिवस असल्यामुळे आज सकाळपासूनच नागरिकांची गर्दी पाहायला मिळत आहे. चिकनचे दर कमी झाले असून, मटणाचे दर मात्र स्थिर असल्याच पाहायला मिळत आहे.

### संत अमरदास बाबा पालखी ची नगर प्रदक्षिणा



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी:** येथील प्रसिद्ध श्री संत अमरदास बाबा यांच्या पुण्यतिथि निमीत्त पालखीची २४ ऑगस्ट रोजी दुपारी नगर प्रदक्षिणा करण्यात आली. पालखी स्थानिक अमरदास बाबा संस्थान येथून निघत अष्टभुजा देवी चौक, आसन गल्ली, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नवीन सराफा लाईन, चाँदणी चौक, जुनी सराफा लाईन, पंचवट गल्ली मार्गाने परत मंदिरात पोहचली. याठिकाणी धार्मिक विधीनंतर पालखीचे समापन करण्यात आले.यावेळी पालखी मार्गावर भाविकांनी मार्गाची स्वच्छता करून रांगोळी काढून पालखीचे स्वागत केले. ठिकठिकाणी भाविकांनी पालखीचे दर्शन घेतले. यावेळी भक्तीगीते आणि जयघोषाने शहर दुमदुमून गेले. यामध्ये पालखीत रिसोड शहराव्यतिरिक्त तालुक्यातील ग्रामीण भागातील भजनी मंडळे सहभागी झाली होती. पालखीत लहान मुले, वृद्ध, महिला मोठ्या संख्येने सामील झाल्या होत्या.भजनी मंडळात महिलांचाही समावेश होता. पालखीची नगर प्रदक्षिणा नंतर मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. याचा लाभ भाविक भक्तांनी घेतला.

# भारत भ्रमण करण्याचा बेत फसला

## बुलढाणा अर्बन बँकेतील ५७ लाख रू सोने चोरणाऱ्याना अठरा दिवसात अटक

दैनिक आपला विदर्भ

■ महेबूब शेख

**उमरखेड** : ०४आगस्ट २०२५ रोजी बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, ढाणकी शाखेच्या सौ. मुग्धा विवेक देशपांडे (विभागीय व्यवस्थापक) यांनी तारण म्हणून तारण ठेवलेले ५७ लाख रुपये किमतीचे सोने अपहार केल्याच्या तक्रारीवरून बिटरगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे गांभींय पाहुन पोलीस अधिक्षक श्री कुमार चिंता यांच्या सुचनेप्रमाणे पांडुरगं शिंदे ठाणेदार बिटरगांव यांनी आरोपी शोध कामी पथक नेमले त्यात पोउपनी सागर अन्नमवार, पोकॉ प्रविण जाधव, पोकॉ रावसाहेब मस्के यांची नेमणूक करण्यात आली होती त्याप्रमाणे गोपणीय माहीती व सायबर सेल यवतमाळ यांचे मदतीने गुन्हयातील






फरार आरोपी उमेश सुनिल वाघ व रामेश्वर गजानन धुमाळे रा. बेलखेड ता.उमरखेड यांना दि.२१आगस्ट २०२५ रोजी पिंपरी चिंचवड पुणे येथुन ताब्यात घेण्यात आले त्याकरीता पोस्टे पिंपरी येथील पोउपनी चिरंजिव दलालवाड यांचे पथकाचे सहकार्य लाभले. दोन्ही आरोपीस पोलीस स्टेशन बिटरगांव येथे आणुन तपास केला व आरोपीने गुन्हयात चोरी केलेल्या ५५५.१५ ग्रॅम सोने किमंत ५७,००,०००/- रू पैकी ५४१.१५ ग्रॅम सोन किंमत अंदाजे ५५,१९७३०/- रूपयेचा मुद्देमाल व गुन्हयात आरोपीने वापरलेली मोटर सायकल जप्त करण्यात आली आहे. व आरोपी याना कोर्टापुढे हजर केले असता कोर्टाने ४ दिवासाची पोलीस कष्टडी रिमांड मंजुर केला आहे.

सदर ची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक यवतमाळ कुमार चिंता सा.मा. अपर पोलीस अधिक्षक गा अशोक थोरात सा, उपविभागीय पोलीस अधिकारी मा. हनुमंत गायकवाड सा यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक पांडुरंग शिंदे, पोउपनि सागर अन्नमवार, पोहेकों रवि गिते, राहुल कोकरे, दत्ता हीगांडे, मोहन चाटे, पोलीस शिपाई प्रविण जाधव, रावसाहेब मस्के, प्रकाश मुंढे यानी यशस्वीरित्या पार पाडली पुढील तपास सपोनी पांडुरंग शिंदे व पोउपनि सागर अन्नमवार हे करत आहेत.

> आरोपी कन्याकुमारी, पटणा, बिहार फिरून नंतर ते पिंपरी चिंचवड पुणे येथून एका मित्राला घेऊन गोवा जाणार होते. याची माहिती मिळताच आमच्या टीम ने त्यांना पिंपरी चिंचवड पुणे पोलीसाच्या मदतीने अटक केली. आरोपीनी आपल्या गावी घरच्या शेतातील गोठ्यात बेलखेड येथे लपून ठेवलेले ५४१.१५ ग्रॅम सोन जप्त करण्यात आले असून चार दिवसाची कष्टडी रिमांड घेतली असून उर्वरित सोन्याचा तपास घेणार आहे.
>
> **-पांडुरगं शिंदे ठाणेदार बिटरगांव**

## खासगी ट्रॅव्हल्सचा अपघातात अकरा प्रवाशी जखमी

### कारंजा - यवतमाळ रस्त्यावरील घटना



दैनिक आपला विदर्भ

**कारंजा/प्रतिनिधी** : दारव्हा-यवतमाळ रस्त्यावरच्या कामठवाडा फाट्याजवळ टायर फुटल्याने खासगी बस पलटी झाली. या अपघातात ११ प्रवासी जखमी झाले आहेत. ही घटना २३ ऑगस्टच्या मध्यरात्री दरम्यान घडली. चंद्रपूर येथून यवतमाळ मार्गे पुणे येथे जात असताना डीएमआर ट्रॅव्हल्सच्या बसचा समोरील टायर फुटल्याने अनियंत्रित बस रस्त्याच्या कडेला पलटी झाली. या अपघातात दर्शना दिलीप बेलसरे (२७, रा. यवतमाळ), जयसिंग ठाकूर (३९, रा. चंद्रपूर), पार्वताबाई मेसेकर (४०) श्रावणी मेसेकर (२२, दोघेही रा.पात्री ता. पांढरकवडा),आदर्श रत्नमाल (२२, रा. चंद्रपूर), प्राची कातरकर (२४, बोरगाव ता. वणी), सुबल मंडल (२९, आष्टी ता. चामोर्शी जी.गडचिरोली), दीपा लखदिवे (४७, ,दिव्या लखदिवे ( १७) , गौरव लखदीवे (२२, तिघेही रा.भिवापूर वॉर्ड चंद्रपूर) व सपना गेडाम (३९ रा.पुणे येरवडा) हे जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच येथील विविध रुग्णवाहिकेच्या रुग्णसेवकांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना उपचारासाठी येथील उपजिल्हा रुग्णालयात भरती केले. प्रथमोपचारानंतर गंभीर दोन जखमींना पुढील उपचारासाठी अमरावती पाठवण्यात आले तर उर्वरित उपचार घेऊन घरी परतले आहे.

## बुलढाणा जिल्ह्यात १९९ कर्मचारी असलेल्या महिलांनी लाडक्या बहिणीचा लाभ घेतल्याची धक्कादायक माहिती उघड

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या विविध विभागातील १९९ कर्मचारी असलेल्या महिलांनी लाडकी बहिणी योजनेचा लाभ घेतल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे. शासनाकडून करण्यात आल्या पडताळणी मध्ये राज्यात ११८२ महिला कर्मचाऱ्यांनी लाडक्या बहिणीचा लाभ घेतलेल्याच समोर आल आहे, त्यापैंकी तब्बल १९९ लाभार्थी महिला बुलढाणा जिल्ह्यातील असल्याची माहिती समोर आली आहे, तर अजूनही पडताळणी सुरू आहे, त्यामुळे हा आकडा वाढण्याची शक्यता आहे. शासनाची दिशाभूल करणाऱ्या या सर्व कर्मचाऱ्यावर लवकरच कारवाई होणार असल्याची माहिती महिला व बालकल्याण विभागाकडून देण्यात आली आहे.

## दारव्हा महावितरण च्या उपअभियंत्याच्या रिकाम्या खुर्ची ला बेशरमाचे हार

### महावितरण कार्यालयात मनसेचे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**दारव्हा/प्रतिनिधी :** दारव्हा शहर व तालुक्यातील महावितरण कार्यालयाच्या कारभाराविषयी वाढत्या तक्रारींमुळे शनिवारी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) उपकार्यकारी अभियंता कार्यालयावर धडक दिली.

गावठाण फिडरवरील वारंवार खंडित होणारा विज पुरवठा, शहरातील सतत जाणारी वीज, सार्वजनिक ठिकाणी असलेल्या उघड्या मुळे निर्माण झालेला जिवीतहानीचा धोका, लोंबकळत असलेल्या विद्युत तारा, सुरू असलेल्या कामातील अनियमितता व भ्रष्टाचार तसेच बाहेरगावाहून अप-डाऊन करणारे अधिकारी व कर्मचारी याविषयी मनसे पदाधिकाऱ्यांनी निवेदन देण्यासाठी कार्यालय गाठले.

मात्र धक्कादायक बाब म्हणजे, कार्यालयात कोणताही अधिकारी वा कर्मचारी हजर नव्हता. त्यामुळे संतप्त झालेल्या मनसे पदाधिकाऱ्यांनी उपकार्यकारी अभियंता यांच्या खुर्चीला बेशरमाचे झाड व हार घालून निषेध व्यक्त केला. त्याचबरोबर कार्यालय परिसरातील अस्वच्छतेविरोधात प्रत्यक्ष बेशरमाचे झाड लावून प्रतीकात्मक आंदोलन केले.

या वेळी मनसे तालुकाध्यक्ष लाला पांडे यांनी इशारा देत म्हटले की, ''जर महावितरणच्या कारभारात सुधारणा झाली नाही, तर मनसे आपल्या खळखट्याक स्टाईलने मोठे आंदोलन उभारेल.''

या निषेध आंदोलनावेळी मनसे कामगार सेना जिल्हाध्यक्ष रणजित झोंबाडे, ईश्वर राठोड, शहराध्यक्ष राम गायकवाड, प्रतिक फेंडर, यश तिरमारे, प्रथमेश उरकुडे, विशाल चव्हाण, शैलेश घाटे, रणजित चव्हाण कृष्णा ढोके, प्रमोद सावळे,बलविर सावळे , तिलक गायकवाड , गणेश चौधरी,सागर गाडे, अनिकेत दळवी, अरविंद जाधव नाना तायडे यांच्यासह मनसे कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

# नांदुऱ्यानंतर खामगाव, शेगावमधूनही २० तलवारी जप्त

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** नांदुरा येथे शे. वसीम शे. सलीम या तरुणाच्या घरातून बुधवारी पोलिसांनी तब्बल ४१ तलवारी आणि इतर शस्त्रसाठा जप्त करून आरोपीला अटक केली होती.

पोलिस कोठडीत चौकशी दरम्यान, वसीमने खामगाव व शेगाव भागातही तलवारींचा पुरवठा केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत, सुमारे ४०,००० रुपये किमतीच्या २० तलवारी जप्त केल्या.

या प्रकरणी खामगाव व

### बुलढाणा जिल्हा पोलीस ॲक्शन मोडवर

शेगाव येथून १३ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे. अटकेत घेतलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे:

अब्दुल इमरान अब्दुल जलील, शेख इरफान शेख भिकारी कुरेशी, शेख नदीम शेख सरदार, मोहम्मद सुलतान मोहम्मद अरिफ, मुजाहिद खान अनिस खान, शहबाज खान इस्माईल खान,



मोहम्मद फारूक मोहम्मद शफी, इंद्रिस इस्माईल गवळी, युसुफ खान अयुब खान, शेख सादिक शेख नासीर, शेख जुबेर शेख रफिक, मुजफर अली साबीर अली, अंकित अनंतराव गावंडे

ही माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.